मराठी असोसिएशन सिडनी इन्कॉर्पोरेटेड
MARATHI ASSOCIATION SYDNEY INCORPORATED
(REG NO: Y 08439-13)
P.O. BOX 32, CARLINGFORD, NSW 2118

# सुंदर आमुचे घर !

प्रिय मित्रहो
सप्रेम नमस्कार !

आम्ही मराठी माणसे, स्वत:ची मायभूमी, नाती-गोती, मैत्री सोडून सातासमुद्रापलीकडे परदेशी आलो. पण आम्ही आमच्या संस्कृतीला, मराठी भाषेला आणि, आणि आपल्या परंपरांना विसरलो नाही. या परधरतीवर काही वर्षांपूर्वी आम्ही एक स्वत:च घर बांधलं आणि त्याला नांव दिलं " मराठी असोसिएशन सिडनी इन्कॉरपोरेटेड".

आमच्या या घरकुलात अनेक प्रकारची विविध क्षेत्रात पारंगत असलेली मराठी माणसे आहत, नाटय क्षेत्रातील कलाकार आहेत, साहित्यिक आहेत, कवी आहेत, संपादक आहेत, लेखक आहेत, तसेच गायक आहेत, वादक आहेत, नाटककार आहेत, संगीतकार आहेत, नर्तक आहेत, शिक्षक आहेत, पाकशास्त्रातील निपुण व्यक्ति आहेत, विविध खेळात पारंगत असलेली माणसे आहेत, अगदी टिकाकार देखिल आहेत. या साऱ्यांचा आम्हाला अभिमान आहे. आमच्या अंगणात आम्ही खेळतो, बागडतो आणि भांडतो देखिल !

आमच्या या संसाराचा विस्तार झपाटयाने होतोय. सध्या आमचे जवळ जवळ तीनशे सभासद आहेत. प्रत्येक वर्षी तीन अंकी नाटक आम्ही करतो. आतापर्यंत आठ नाटके आणि नऊ एकाकिका आम्ही सादर केल्या. अनेक वेळा शास्त्रीय गायन आणि सुगम संगीताचे कार्यक्रम आम्ही करतो. अनेक घराण्यातल्या मुल-मुली इथेच शास्त्रीय गायन, वादन आणि भरतनाटयमच शिक्षण घेत आहेत. या मुलांना उत्तेजन देण्यासाठी विविध कला गुणदर्शन हा कार्यक्रम आम्ही करतो. श्री मंदिरात पवित्र भावनेने आम्ही एकत्र येतो, आम्ही दिवाळी मेळावा भरवतो. तसेच प्रत्येक वर्षी भारतातन अनक कलावंत बोलावतो, ( पु.ल.दशपांडे, व.पु.काळे, रामदास पाध्ये, प्रभाकर कोरेकर, सौ. रंजना जोगळेकर इत्यादि ) आणि त्यांचे कार्यक्रम ऑस्ट्रेलियात ठीकठीकाणी सादर करतो.

या वर्षी मात्र मंडळान गरुड भरारी मारलीय. शनिवार दिनांक ३० सप्टेंबर आणि रविवार दिनांक १ ऑक्टोबर रोजी ' अखिल ऑस्ट्रेलिया मराठी संमेलन ' आम्ही भरवित असून या संमेलनाच्या निमित्ताने स्मरणिका प्रकाशित केली जाणार आहे.

आमच्या या घरकुलाची नेहमीच भरभराट व्हावी हीच विघ्नहर्त्याकडे प्रार्थना.

नेपोलियन अलमेडा
अध्यक्ष
कार्यकारी समिती १९९५

# मागे वळून पहातांना

ललिता कानेटकर
सरोज रानडे

१९८२ चे वर्ष ! सिडनीत येऊन आम्हाला काही वर्षे झाली होती. पार्ले आणि दादर सारख्या सांस्कृतिक अड्डयातून इथे आल्यामुळे म्हणा किंवा काहीही म्हणा, त्यावेळी सिडनीमधे आणि आसपास असलेल्या मराठी मंडळींनी नियमित येऊन भेटावं, ओळखी वाढवाव्या, त्याचबरोबर मराठी साहित्य, संगीत, नृत्य, नाटय इत्यादिचा आनंद लुटावा असे आम्हाला नेहमी वाटायचं. अशा एकत्र येण्याने सिडनीमधे गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या मराठी लोकांच्या जीवनात आम्ही कशाची भर घालणार होतो कोण जाणे ....... पण शेवटीं सर्वांनी एकत्र येऊन दूरवर सोडून आलेलं मराठीपण एकत्र उपभोगावं या एकाच निर्मळ हेतूने आम्ही दोघींनी बसून जमतील तेवढया मराठी लोकांचे पत्ते टेलिफोनच्या डिरेक्टरीमधून शोधून काढले आणि दोघींच्या सहयांनी एक पत्र लिहून ते सर्वांना पाठवण्याचा ढालगजपणा केला! कनबेरा, वुलंगांग, गॉसफर्ड, वायोंग, लिव्हरपूल, पेन्रिथ अशा सिडनी आणि आसपासच्या भागातून हुडकून हुडकून चाळीस मराठी कुटुंबांना एकत्र जमविले. मात्र त्या उत्साहाच्या भरात पत्राची एक प्रत जपून ठेवावी, फोटो काढावे, तारीख वार टिपून ठेवावे हे काही लक्षात राहिले नाही. त्यामुळे १९८२ साली आम्ही नेमके केव्हां सर्वजण प्रथम एकत्र आलो ते सांगता येत नाही. पत्र पोहोचल्यावर सर्वांचे आवर्जून फोन आले, आता सर्वांची नावे लिहिणे अशक्य आहे, पण प्रत्येकाने आम्हाला फोन करुन मदतीचा हात पुढे केला, कोणी बैठका, कोणी फुले, कोणी लाडू तर कोणी चिवडा! प्रत्येकाने आपापल्या परीने भेटीची तयारी करायला हातभार लावला. प्रत्यक्ष भेटीच्या दिवशी सर्वांच्या चेहेऱ्यावर कुतूहलमिश्रित आनंद होता. सर्वांनी मिळून प्रथम एक चांगला निर्णय घेतला की मंडळ वगैरे काही चालू करु नये पण दोन-तीन महिन्यांनी एकदा एकत्र येऊन काहीतरी कार्यक्रम करावा. मी आणि ललिताने दोन ते तीन वेळां काही कारणाने लोकांना एकत्र जमवून कार्यक्रम केले. पण मग असं वाटलं की मंडळी सिडनीमधे सर्वदूर पसरलेली, तेव्हां सिडनीचे काही भाग करुन प्रत्येक भागातील लोकांनी एक एक कार्यक्रम दोन-तीन महिन्यांनी एकदा करावा. त्याप्रमाणे मग एकदा नॉथ रॉकस् येथे हॉलमधे जमलो, एकदा सेंटेनियल पार्कमधे सहल झाली, तर एकदा वुलंगॉंगला समुद्राकाठी पावभाजीचा झोंकदार कार्यक्रम झाला. प्रत्येक कार्यक्रमासाठी त्या त्या वेळी वर्गणी जमा करुन खर्च भागविला जाई. जेवढी जमा तेवढा खर्च, शिल्लक शून्य! याच सुमारास नवरंग या श्री मंदिरातर्फे होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात एका लहान मुलीचा नाच आणि बंडू, नानू आणि गुलाबी हत्ती या एकांकिकेतील पाच मिनिटांचा एक प्रवेश सादर करुन मराठी सांस्कृतीक कार्यक्रमांची मुहुर्तमेढ रोवली. पण झाले काय की मुलींचा नाच अगदी सुरवातीला तर नाटयप्रवेश रात्री ११ वाजता सादर करावा लागला. आलेली मराठी मंडळी आपल्या खुर्च्या न सोडता बसली होती. आता सांगा, मराठी माणूस नाटकवेडा म्हणायचा नाही तर काय?

पण यावरुन एक धडा घेतला आणि ठरविले की आता मराठी कार्यक्रम फक्त मराठी लोकांपुढेच स्वतंत्रपणे सादर करायचा आणि मग १९८३ साली प्रथम श्री मंदिरातली गणेशपूजा झाल्यानंतर तेथेच मनोरंजनाचे कार्यक्रम करायला सुरवात केली. प्रथम मुलांचं एक नाटुकले झाले, नाटकांतले संवाद त्यांनी टेपवरुन पाठ केले कारण सर्व आईवडिलांच्या हौसेखातर! इथे मराठी बोलण्याची पंचाईत, तर मराठी वाचणारी मुले कोठून मिळणार? मोठयांमधील काहीं मंडळींसाठीही हाच उपाय करावा लागला होता! (खरंच!) मोठयांसाठी प्रथम पु.ल. देशपांडयांच्या ' तुज आहे तुजपाशी ' मधील प्रवेश आणि ' एका रविवारची कहाणी ' मधील प्रवेश सादर केले. या देवळातल्या कार्यक्रमासाठी पडदे कुठले? तर आनंद प्रधान आणि आनंद बापट यांच्या घरचे आणि ओढायलाही तेच दोघे! पण मजा होती. सर्वच लुटूपुटीचे आणि भातुकलीसारखे वाटायचे. पडद्याला चिकटून प्रेक्षक बसायचे, मायक्रोफोनची जरुरच नव्हती, एकदातर वेषभूषेला जागा नव्हती म्हणून श्री मंदिरात मागे तंबू टाकला व वेषभूषा

केली. नाटक, गाणे याबरोबरच खेळसुद्धा! तसेच नवीन माणसांच्या ओळखी होत होत्या. पण लवकरच श्री मंदिराची जागा अपुरी पडू लागली म्हणून १९८५ साली गणेशपूजा झाल्यावर मोर्चा एर्मिंग्टनच्या हॉलवर वळविला आणि त्यानंतर पुढची ३ - ४ वर्षे धडाक्याने दरवषी एक अशा एकांकिका बसविल्या.उदा - सारे कसे शांत शांत,बायकांत पुरुष लांबोडा इ. इ. यावेळी सगळ्यांची भिस्त होती संजय लेले याच्यावर!

यानंतर मराठी मंडळींची संख्या वाढतच गेली. मग नियमीत भेटणं जरा कठीण होऊ लागलं. याच सुमारास भारतातून येणाऱ्या पाहुण्या कलाकाराचा कार्यक्रम आखण्याची सिडनीकरांना संधी आली. परंतु ही जबाबदारी कोण घेणार? आर्थिक पाठबळ कसे पुरविणार? अशा अडचणींबाबत वुलंगाँग येथे झालेल्या कार्यक्रमात चर्चा झाली. आणि त्यात मग एखादी संस्था किंवा मंडळ असणं आवश्यक आहे यावर एकमत झाल्याने मराठी असोसिएशन, सिडनी ची १९८६ मध्ये स्थापना झाली. मग सात जणांची कार्यकारी समिती मंडळाच्या कार्यक्रमांची आखणी करुन मंडळाचा कारभार पाहू लागली. मग दरवर्षी कार्यकारी समिती नेमून कार्यक्रम होऊ लागले. चैत्रातील हळदीकुंकू, विविध गुणदर्शन, गाणी, खेळ, रांगोळी स्पर्धा, अगदी नवीन पिढीला आवडणारा डिस्को सुद्धा दोन - तीन वर्षे झाला.. १९८७ साली ' लेकुरे उदंड झाली ' या नाटकातील संपूर्ण दुसरा अंक सादर झाला.१९८८ साली 'दिनूच्या सासूबाई राधाबाई ' हे तीन अंकी मराठी नाटक प्रथम सादर झाले. भारतातून वेगवेगळ्या कलाक्षेत्रातील कलाकार आणून त्यांचा कार्यक्रम करण्याचा समितीचा प्रयत्न असे. त्या दृष्टीने व. पु. काळे यांचे कथाकथन, रामदास पाध्ये यांच्या ' बोलक्या बाहुल्या ' , मेलबर्न मंडळाच्या सहयोगाने संगीता माटे यांचं गाणं, ॲडलेडकरांच्या मदतीने लालन सारंग यांचा एकपात्री प्रयोग व गेल्या वर्षी पं. प्रभाकर कारेकर यांचे शास्त्रीय संगीत व नाटय संगीत नक्कीच सर्वांच्या स्मरणात राहील.

१९८९ मध्ये मात्र मंडळाची अधिकृत नोंदणी करण्याची आवश्यकता भासू लागली. कारण अशा प्रकारची अधिकृत नोंदणी केल्याने संस्थेला एक सामाजिक आणि सरकारी मान्यता प्राप्त होते. ही नोंदणी डिपार्टमेंट ऑफ कंज्यूमर अफेअर्स मधे करावी लागते. त्यासाठी मंडळाची घटना आणि नियमावली बनवणे आवश्यक असते. तसेच संस्थेचे स्वरुप धर्मादाय करण्यासाठी संस्थेचे तीन वर्षाचे हिशोब (ऑडिट) पास करुन घ्यावे लागतात. श्री जयंत कुलकर्णी हयांनी अशा सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता अत्यंत नेटाने करुन असोसिएशनची अधिकृत नोंदणी १९८९ साली केली आणि अशा तऱ्हेने मराठी मंडळ शेवटी आकाराला आले. संस्थेचे स्वरुप धर्मादाय बनविण्यासाठी देखिल त्यांनी बऱ्याच बाबींची आणि कागदपत्रांची पूर्तता करुन ठेवली आहे. आणि त्यामुळे आज लवकरच मंडळ हा महत्वाचा टप्पा पार पाडेल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

मंडळ चालू करताना मनांत एक स्वप्न होते की सिडनीत दरवर्षी एक छान तीन अंकी मराठी नाटक पहायला मिळावे. ही ईच्छा पूर्ण झाली म्हणून समाधान वाटले व आनंदही झाला. आता गेल्या पाच - सात वर्षात तर सिडनी मध्ये गुणी कलावंतांची सर्वच क्षेत्रात इतकी भर पडली आहे की उत्तमोत्तम मराठी नाटक, नृत्य, संगीत आणि साहित्य यांचा आनंद आपणास लुटायला मिळत आहे.

एकंदरीत मागे वळून पहातांना सिडनीकर मराठी मंडळींना एकत्र आणण्याचा आमचा उपद्व्याप किंवा ढालगजपणा अगदीच अंगाशी आलेला नाही तर!
हा लेख संपविताना याठीकाणी पुन्हा एकदा नमूद करावेसे वाटते की त्यावेळी सिडनीत रहाणाऱ्या प्रत्येक मराठी कुटुंबाची मदत, सहकार्य आणि पाठींबा आम्हाला होता म्हणूनच हे सुंदर मराठी मंडळ आज आकाराला आलेले आहे.
सर्वांना धन्यवाद!

ललिता कानेटकर - सरोज रानडे

# शून्यांतून वाटचाल

अरुण ओगले

फेब्रुवारी १९८६ चा महिना होता. अजून मराठी मंडळ स्थापन झाले नव्हते. परंतु सिडनीमधील दोन उत्साही महिलांनी - सौ. ललिता कानेटकर व सौ. सरोज रानडे यांनी पुढाकार घेऊन सिडनीकरांचे तीन विभाग पाडून त्यातील रहिवाश्यांना अनौपचारिक कार्यक्रम करण्यास प्रोत्साहित केले होते. अशाच या फेब्रुवारीच्या कार्यक्रमात " सिडनी व परिसरातील मराठी भाषिकांचे मराठी मंडळ स्थापावे " या विषयावर चर्चा झाली त्यावेळी येथे रहाणारे मराठी भाषिक बहुसंख्येने उपस्थित होते. सर्वांनाच ही कल्पना अतिशय आवडली. त्यामुळेच प्रभावित होऊन की काय माहित नाही परंतु जेव्हां मंडळावर काम करण्यासाठी नांवे विचारण्यात आली तेव्हां मी तावडतोब खजिनदाराच्या कामासाठी हात वर केला.

मराठी मंडळ १९८६ साली सुरु झाले तेव्हां अर्थातच् शून्यातून सुरुवात झाली. १९८६ च्या गणेश चतुर्थीच्या कार्यक्रमात वर्गणी जमा करुन मंडळाच्या आर्थिक आघाडीचा श्रीगणेशा केला. त्या दिवशी बरोबर ५२० डॉलर्स वर्गणी जमा झाली. मराठी मंडळाच्या स्थापनेचा उद्देश हा नफा करण्याऱ्या संस्थेची निर्मिती असा जरी नसला तरी संस्थेला भविष्यातील प्रगतीसाठी आर्थिक पाठबळाची आवश्यकता होती. कौतुकाने एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की ही जाणीव फक्त कार्यकारी मंडळातील सभासद व त्यांचे जोडीदारच नव्हेत तर ईतर सर्व सभासदांना होती. त्यामुळे कुठलाही कार्यक्रम असो त्याला सर्व सभासदांचा सक्रिय पाठींबा असे. एक प्रसंग आठवतो ··· सौ लालन सारंग ॲडलेडला आल्या होत्या. त्यांचा कार्यक्रम सिडनीला होऊ शकेल का अशी विचारणा करण्यात आली होती. सर्व सभासदांचा पाठिंबा मिळणार अशी खात्री असल्यामुळे मी फोनवरच बेधडक होकार दिला होता. कार्यक्रमाला फक्त तीन आठवडयांचा अवधी होता, परंतु इतक्या अल्प वेळांत आम्ही एक अत्यंत यशस्वी कार्यक्रम आयोजित करु शकलो. मंडळाची आर्थिक स्थिती लक्षांत घेतां खाद्यपदार्थांची सोयसुद्धा कार्यकारी मंडळ किंवा इतर सभासद विनामूल्य करीत.

विक्रीचा फायदा मंडळाला मिळत असे. या वरुन एक दूसरी गोष्ट आठवली म्हणजे जेंव्हा पहिले तीन अंकी नाटक " दिनूच्या सासुबाई राधाबाई " हे पॅरामॅटा हॉलमध्यें १९८८ साली केले तेव्हां खर्चाचा अंदाज नव्हता, तेंव्हा मंडळाला तोटा येऊ नये व नक्की किती लोक येतील याचा अंदाज यावा म्हणून आम्ही चक्क ॲडव्हान्स तिकीटविक्री केली होती!

गेल्या नऊ वर्षातील प्रगती पाहून खूप आनंद होतो. छोटया कार्यक्रमातून सुरवात होत आतां तीन अंकी नाटकापर्यंत मजल पोहोचली आहे. भारतातून कलाकारांना आमंत्रित करण्याची हिंमत आली आहे. कार्यकारी मंडळात अनेक लोकांना काम करण्यास वाव मिळाला आहे. भिन्न भिन्न पेशांतील व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली मंडळाला नविन विचारसरणी मिळाली आहे. शून्यांतून सूरु झालेले मंडळ आता पांच आंकडी झालेले आहे.

मराठी भाषिकांच्या वाढत्या संख्येप्रमाणे मंडळाचा विस्तारही वाढला आहे. कालमानाप्रमाणे आता बदलही घडत आहेत. मराठी मंडळाचे आता मराठी **' असोसिएशन '** झालेले आहे. पूर्वी खजिनदाराचा जमाखर्च हिशोबाच्या वहीत लिहीला जात असे व तेथेच त्याचा मेळ घातला जात असे. आता त्याची 'बॅलन्सशीट' करावी लागते. मंडळाच्या कार्यक्रमाची माहितीपत्रे पूर्वी हस्तलिखितांमध्ये असत, आता त्याची जागा कंप्युटरने घेतली आहे. खाण्याची व्यवस्था सभासद नि:शुल्क करीत तर आता त्याचे कंत्राट दिले जाते. कालगतीप्रमाणे हे बदल अपरिहार्य आहेत, परंतु मला खात्री आहे की कृतीचे मार्ग बदलले तरी त्यामागील भावना तीच राहिल व मराठी मंडळाची नाही ' असोसिएशनची ' उत्तरोत्तर भरभराट होईल.

अरुण ओगले
5 The Cloisters
Cherry Brook 2126

# सिडनी मराठी मंडळ - १९९३

अनिल सप्रे

सिडनी मराठी मंडळाची स्थापना होऊन काही फार वर्षे झाली नाहीत, पण अल्पावधीतच मंडळाने चांगलाच जम बसविला यात काहीच शंका नाही. हल्ली कुठल्याही कार्यक्रमाला अडीचशे ते तीनशे मराठी मंडळी सहज जमतात. प्रतिवर्षी कार्यक्रमांचा दर्जा उंचावतच चालला आहे. त्यांना मिळणारा भरघोस प्रतिसाद आणि त्यातल्या कलावंतांचे कौतुक या दोन्ही गोष्टींमुळे सर्वांनाच आपल्या परिश्रमांचे चीज झाल्यासारखे वाटते.

मराठी मंडळाच्या छोटयाशा इतिहासात १९९३ साल संस्मरणीय ठरेल यांत वादच नाही. काही नवीन उपक्रम, दजेदार कार्यक्रम, कार्यक्रमांची संयोजकता व घेतलेली मेहेनत आणि सर्वांनी दाखविलेला उत्साह यामुळे सवांच्या तोंडी विषय एकच असायचा - मंडळाचा कार्यक्रम !

सर्वांत लक्षात राहण्यासारखी गोष्ट म्हणजे सर्व कार्यक्रम ठीक ठरलेल्या वेळी सुरु झाले आणि याला प्रेक्षक आणि सभासदांनीही चांगलीच दाद दिली. या मंडळाने चालू केलेला एक महत्वाचा उपक्रम म्हणजे मुलांकरीता मराठीचा शिक्षणवर्ग ! दर रविवारचे हे वर्ग सुमारे आठ महिने चालू होते आणि खूप मुलांनी त्यात भाग घेऊन मराठी आत्मसात केली. या वर्गात आम्ही अनेक पाहुणे बोलावून मुलांना भारतातील ऐतिहासिक आणि पौराणिक व्यक्तिंच्या गोष्टी सांगितल्या, त्यामुळे मुलेच नव्हे तर त्यांचे पालकही खूष होते.

मंडळाने एक फोटोकॉपिअर विकत घेतला आणि त्याचा पहिला उपयोग सर्व सभासदांची प्रथमच एक डिरेक्टरी तयार करुन अल्प किंमतीत उपलब्ध करुन देण्यात झाला. आतातर आम्ही ऐकतो की बरीच मंडळी गाडीमध्ये ग्रेगरी बरोबर मराठी मंडळाची डिरेक्टरी सुद्धा ठेवतात म्हणजे पत्ता चुकायला नको !

दिवाळीचा कार्यक्रम सवात देखणा झाला असं म्हणायला पाहिजे. कंदिलांची रोषणाई, रुचकर जेवणाची मेजवानी आणि शानदार सभागृह या सर्वांमुळे खरोखरच दिवाळीचा उत्साह ओसंडून जात होता.

तसेच कार्यक्रमांना स्पॉन्सरशिप मिळवणे, वरचेवर सभासदांच्या प्रतिक्रीया मागविणे व त्यानुसार कार्यक्रमांची आखणी आणि मांडणी करणे, सभासदांना आणि कलाकारांना कार्यक्रमात भाग घेण्यासाठी प्रोत्साहन देणे इत्यादि छोटया मोठया उपक्रमांना चालना दिली.

एकंदरीत सबंध वर्ष खूपच गडबडीत गेलें, खूप मजा आली, काही केल्याचे समाधान वाटले. या कार्यक्रमांमुळे, उपक्रमांमुळे जर काही जास्त सभासद एकत्र आले असले तर आमच्या श्रमांचे सार्थक झाले असे म्हणायला पाहिजे. मंडळ हे सर्वांचे आहे. मायभूमीपासून इतक्या दूर आल्यावर आपल्या संस्कृतीचे धागे जोडून आणि जपून ठेवायला आपणा सर्वांनाच आपल्या मराठी मंडळाची गरज आहे.

१९९५ सालच्या मंडळाने आयोजित केलेले हे अखिल ऑस्ट्रेलिया मराठी मंडळींचे संमेलन म्हणजे आपल्या सांस्कृतिक वाटचालीतला एक महत्वाचा टप्पा आहे. त्याबद्दल कार्यकारी समितीचे मन:पूर्वक अभिनंदन !!

अनिल सप्रे